कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या नागरीकांना प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत राज्य शासनाच्या हिश्श्याचा पहिला हप्ता विशेष बाब म्हणून वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृहनिर्माण विभाग

शासन निर्णय क्रमांक : प्रआयो २०१९/प्र.क्र.१०४/गृनिधो-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
३ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २० सप्टेंबर, २०१९

वाचा:-

१) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्रमांक, प्रआयो २०१९/प्र.क्र.११०/गृनिधो-२, दि.०९.१२.२०१५.

२) महसूल व वन विभागाचे पत्र क्र.सीएलएस-२०१९/प्र.क्र.१६५/म-३, दि. २०.०८.२०१९.

३) शासन पत्र क्र. प्रआयो २०१९/प्र.क्र.९६ (अ)/गृनिधो-२,दि. २७.०८.२०१९.

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत “सर्वांसाठी घरे -२०२२” बाबत केंद्र शासनाने सन-२०१५ मध्ये धोरण जाहीर केलेले आहे. सदर धोरणाची राज्यात अंमलबजावणीबाबत दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थ्यांव्दारे वैयक्तीक स्वरुपातील घरकुल बांधण्यास अनुदान (BLC) अंतर्गत केंद्र शासनाकडून रु. १.५० लक्ष व राज्य शासनाकडून रु. १.०० लक्ष अनुदान देण्यात येते.

कोल्हापूर, सांगली व सातारा या तीन जिल्ह्यांमध्ये ऑगस्ट, २०१९ मध्ये आलेल्या महापूरामध्ये अनेक घरे बाधित झालेली आहेत. अशा घरांकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (EWS) नागरीकांना प्रधानमंत्री आवास योजनेच्या BLC घटकांतर्गत लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील महापूरामध्ये बाधीत झालेल्या घरकूलांपैकी प्रधानमंत्री आवास योजनेच्या निकषानुसार पात्र असलेल्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (EWS) मधील घरकुलांचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्व्हेक्षण करुन बाधीत घरांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तात्काळ सुकाणू अभिकरणास (MHADA) सादर करण्याबाबत KPMG संस्थेस संदर्भाधीन दि.२७.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे या योजनेंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची (CSMC) मान्यता प्राप्त झाल्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानाचा पहिला हप्ता वितरीत करण्यात येतो. तथापि, गंभीर पूरपरिस्थिती विचारात घेता CSMC ची मान्यता मिळण्यापूर्वी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मंजुरी व संनियंत्रण समितीच्या (SLSMC) मान्यतेने राज्य शासनाच्या हिश्श्याचा पहिला हप्ता विशेष बाब म्हणून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयातील महापूरामुळे बाधीत झालेल्यांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र.४ (BLC) अंतर्गत पात्र व्यक्तींना राज्य शासनाच्या हिश्श्यापैकी म्हणजे रु.१ लक्ष रकमेपैकी पहिला हप्ता (४०%) रु. ४०,०००/- महाराष्ट्र निवारा निधीतून विशेष बाब म्हणून वितरीत करण्यास यान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर घरकुलांच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) राज्यस्तरीय मान्यता व संनियंत्रण समितीची (SLSMC) मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर निधी वितरीत करण्यात यावा. त्यानुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल म्हाडा प्राधिकरणास सादर करण्याची कार्यवाही संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी तात्काळ करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९२११६३२०००६०९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=f4fd0ac26ad2a365a8e829907c5e76b911fed9b1b9e48cc2854c4b8a14b0d70c, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=befbb0ae84804c4da8d35abf2195ebb1dc727de9b0a094bea77f4ca6be5965db, ou=HOUSING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2019.09.23 10:55:10 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई .
२) मा. मंत्री (गृहनिर्माण), मंत्रालय, मुंबई.
३) सह अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ ,साखर भवन, नरीमन पॉईट, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण), मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
६) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७) संबंधित विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी
८) संबंधित आयुक्त, महानगरपालिका
९) मुख्य अधिकारी, पुणे, गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, पुणे.
१०) संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत.
११) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.